



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA






vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रवीवार ३ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# काँग्रेसची भारत जोडो न्याय यात्रा महाराष्ट्रात प्रवेश करणार

## लोकशाहीमध्ये संवाद साधन्यासाठी राहुल गांधी ठाण्यात येणार तरुणांशी संवाद साधनार.

### माहागाईच्या विरोधात हि न्याय यात्रा काम करणार लोकाशाही टिकावी यासाठी प्रयत्न करणार



### मित्र पक्षांनाही आमंत्रण- थोरात

ज्या ठिकाणी अडचणी आहेत. त्या ठिकाणी लक्ष देणं गरजेचं आहे. मोदी यांच्या अनेक सभा सुरू आहे. मात्र मणिपूरमध्ये जाऊ शकले नाही. राजकारण आणि सत्ता डोळ्यासमोर ठेवून सर्व भारतीय जनता पक्षाच कार्यपद्धती दिसत आहे. रॅलीमध्ये आणि पब्लिक मिटिंगसाठी मित्र पक्षांना आम्ही आमंत्रण दिलं आहे, असं थोरात म्हणाले. देश हा सर्वांचा आहे. लोकशाहीमध्ये संवाद साधण्याचा राहुल गांधी ठाण्यात साधणार आहे. तरुण पिढी मोठ्या संख्येने येणार आहे, असंही ते म्हणाले.

### संवाद सभा होणार

16 तारखेला राहुल गांधी ठाण्यातील जांभळी नाका या ठिकाणी संवाद साधणार आहेत. भिवंडीतुन सुरुवात होणार आहे. मणिपूर वाईट इतिहास आहे. महागाई वाढलेली आहे. सत्ताधाऱ्यांमध्ये दंगल सुरू आहे. हे आम्हाला दिसत आहे. देशात राज्यात दंगल सुरु आहे. त्यासाठीच न्याय यात्रा हे काम करत आहे. महागाई च्या विरोधात ही न्यायात्र काम करत आहे. लोकशाही टिकावी यासाठी ही न्याय यात्रा आहे, असं बाळासाहेब थोरात यांनी सांगितलं.

वादळवार्ता]
काँग्रेसची भारत जोडो न्याय यात्रा सध्या सुरु आहे. ही यात्रा लवकरच महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. हा सगळा कार्यक्रम कसा असेल? याबाबत काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी माहिती दिली आहे. राहुल गांधी यांची न्याय यात्रा सुरू आहे. 12 तारखेला गुजरातनंतर नंदुरबार जिल्ह्यामध्ये प्रवेश करत आहे. त्यानंतर धुळे, मालेगाव, नाशिक आणि आपल्या या मार्गाने जे वाडा मार्गाने ते आपल्याकडे येते आहे. 16 तारखेला सकाळी सुरुवात झाल्यानंतर भिवंडीच्या मुक्कामातच 16 तारखेला ते संवाद करतील. ठाण्यात जांभळी नाका येथे सकाळी राहुल गांधी याची 16 तारखेला स्टेज नसणारी सभा होणार आहे, असं बाळासाहेब थोरात म्हणाले. न्याय मागणारी न्याय यात्रा”

भारत जोडो न्याय यात्रा ही मुलुंडला थांबणार दादर चैत्यभूमी या ठिकाणी समारोप असणार आहे. 17 तारखेला सार्वत्रिक मीटिंग आघाडी म्हणून मुंबईला घेण्यात येणार आहे. देशामधील ज्या पद्धतीचे वातावरण सुरू आहे. त्यासाठी ही विशेष यात्रा आहे. 2014 पासून मोदी कारभार करत आहे, देशापुढे अनेक प्रश्न आहेत. लोकशाहीवर आघात होत आहे. या सर्व गोष्टीवरती न्याय मागणारी न्याय यात्रा आहे, असं बाळासाहेब थोरात यांनी सांगितलं आहे.

## जीवाचीवाडी साठवण तलावातील विद्युत पंप काढण्यास प्रशासन सज्ज.

वादळवार्ता/येवता
केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे साठवण तलवातील विद्युत पंप बंद करण्याचे आदेश तहसीलदार तथा दंडाधिकारी, केज यांनी आदेश निर्गमित करून सिंचन विभाग,महावितरण विभाग, कर्मचारी तहसील कार्यालय केज येथील तलाठी, मंडळ अधिकारी कर्मचाऱ्यासह जीवाचीवाडी ग्रा.पं.चे कर्मचाऱ्यांसह साठवण तलावातील विद्युत पंप बाहेर काढणे साठी प्रशासन सज्ज झाले असुन आदेश तहसीलदार, केज यांनी संबंधित कार्यालयास आदेश देऊन कळविले होते परंतु संबंधित विभागाच्या कर्मचारीने तहसीलदार यांच्या आदेशाचे पालन न केल्याने स्वत:केज तहसीलदार,अभिजित जगताप यांनी आज दि.०२मार्च-२०२४ रोजी दुपारी ०२:००वा.दरम्यान स्वत: फौजफाट्यासह जिवाची वाडी साठवण तलावात उपस्थित राहून कारवाही केली यावेळी विडा मंडळ अधिकारी सुहास डोरले, जिवाची वाडी सज्जा तलाठी उत्रेश्वर घुले, जिवाची वाडी ग्रामसेवक महिंद्र मुंडे, जलसंपादा विभागाचे श्रीनिवास हंगे,महावितरण कंपनीचे लाईनमन शिवाजी घुले, सरपंच प्रतिनिधी दिपक काळे इत्यादी नी कारवाही केली. या पूर्वीच आदेश क्र.७७/दि. १३/०२/२०२४ च्या पारीत केलेने कारवाही चालु केली परंतु स्थानिक पदाधिकारी यांनी विनंती केलेने दोन दिवसाचा वेळ देण्यात आला.




## डॉ. मोगरेकर स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे नवे अधिष्ठाता

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अंबाजोगाई स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता पदाचा पदभार याच महाविद्यालयातील जीव रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मुकुंद मोगरेकर यांचेकडे सोपवण्यात आला आहे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या रिक्त जागी डॉ. मुकुंद मोगरेकर यांनी पदभार सांभाळावा असे आदेश वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त यांनी आज काढले आहेत. स्वाराती मधील ज्येष्ठ अध्यापक डॉ. मुकुंद रा. मोगरेकर, प्राध्यापक व विभाग प्रमुख जीवरसायनशास्त्र, स्वारातीग्राशावैम, अंबाजोगाई यांचेकडे सोपविला आहे. डॉ मधील ज्येष्ठ अध्यापक डॉ. मुकुंद मोगरेकर यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.




## सुषमा अंधारे यांचे लोकसभा निवडणूक लढण्याचे संकेत; श्रीकांत शिंदेंना अंधारेंनी टोला लगावला

**दैनिक वादळ वार्ता**
शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आज कल्याण दौऱ्यावर आहेत. कल्याण पश्चिममधील के एम अग्रवाल कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. त्यानंतर सुषमा अंधारे यांनी माध्यमांशी संवाद साधला. आगामी लोकसभा निवडणूक आणि राजकीय मुद्द्यांवर सुषमा अंधारे बोलत्या झाल्या. या लोकसभा निवडणुकी सुषमा अंधारे देखील मैदानात उतरणार असल्याची चर्चा आहे. त्यावर सुषमा अंधारेंनी स्पष्ट भाष्य केलं. तसंच कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदेंनाही सुषमा अंधारेंनी टोला लगावला. सुषमा अंधारे काय म्हणाल्या?माझं नाव चर्चेत आहे. मात्र मला अधिकृत निरोप नाही. मला फक्त काम करायचं आहे. मुक्त संवादच्या माध्यमातून माझी ती वाट आहे आणि त्यासाठी मी निघाली आहे. पण पक्षाने सांगितलं, तर वाटेल त्या उमेदवाराच्या विरोधात मी लढले, असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं. खासदार श्रीकांत शिंदे हा फारच मोठा अडचणीचा डोंगर आहे, असं का वाटतं? लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी तो अडचणीचाच डोंगर आहे. त्याच्या सामोरं जाताना आम्हाला तो अडचण वाटत नाही, असं म्हणत कल्याणमध्ये बोलताना सुषमा अंधारे यांनी श्रीकांत शिंदेंना टोला लगावला.‘मुक्त संवाद’वर अंधारे म्हणाल्या...मातृत्व ते शिवतीर्थ मुक्त संवादाचा आजचा 23 वा दिवस आहे. अकरावी लोकसभा कल्याणमध्ये ही यात्रा पोहोचली आहे. तीस दिवसापासून लोकांचे वेगवेगळे प्रश्न समजून घेत आज कल्याणमध्ये पोहोचलो आहोत. मातोश्रीवर याचा समारोप होणार आहे. आज कल्याण मध्ये सभा उद्या ठाण्यात आणि पुढे धारावीमध्ये मोठी सभा होणार आहे, असं सुषमा अंधारे यांनी यावेळी सांगितलं.त्या टीकेला उत्तरअति गर्भसमिट मुख्यमंत्री शिंदेना आपल्या पोरांना दोन वेळा खासदार करावसं वाटतं. मग काय हरकत आहे? त्यांच्या बाप दादांनी हा महाराष्ट्र घडवण्यासाठी वाढवण्यासाठी रक्ताचे पाणी केलं. महाराष्ट्राची सत्ता मत्ता अस्मिता राहण्यासाठी त्यांच्या पिढ्या येथे घालवल्या त्यांच्या मुलाला मुख्यमंत्री करणं? हे ठाकरे साहेबांची नाही ही सर्व शिवसैनिकांची मागणी आहे, असं म्हणत अमित शाह यांनी आदित्य ठाकरेंवर केलेल्या टीकेला उत्तर दिलं आहे



## संपादकीय

# आयुष्य

आयुष्य म्हणजे सुख दुःखाचा प्रवास. या प्रवासाच्या प्रवाहात माणुस इतका बुडालाय की त्याला आयुष्य म्हणजे नक्की काय हेच समजेणास झालयं. आयुष्याचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे नाती, माणुसकी, आपुलकी पण माणसाला याचाच विसर पडत चाललाय. नाव,पैसा,प्रतिष्ठा ही जगण्यासाठी महत्त्वाची असेलही. पण आपल्या जवळच्या माणसाला आपलं प्रेम, जिव्हाळा, माया भेटतच नसेल तर काय करायच या पैशाचं??? माणसाला याचा विसर पडत चाललाय की माणसांसाठी पैसा आहे, पैशासाठी माणूस नाही आहे. आपण जे शरीर घेऊन मिरवतोय ना ते सुध्दा देवाने तात्पुरते दिलेले वरदान आहे. खूप क्षणिक आहे आयुष्य. इतक क्षणिक की आज झोपल्यावर उद्या उठण्याची सुद्धा शाश्वती नाही. आयुष म्हणजे काय ??? "सुख-दुःखाचा प्रवास आपल्या माणसांची असेल साथ तर प्रत्येक संकटावर करू मात......." आता झालय अस की, आपलीच माणसं आपल्यावर जळतात... अरे !!! जर शरीर सुद्धा आपलं नसेल. तर कशासाठी हे जळणं, रागवण. आयुष्य खुप सुंदर आहे, फक्त माणसाला जगण्यातील आनंद घेता यायला हवा. कोणी आपल्यावर नाराज होत असेल तर त्याची वेळीच क्षमा मागा, झाल गेल विसरून जा कारण आपल्यावर तेच नाराज होतात जे आपल्याला त्यांच मानतात. फार वेळ कोणाबद्दल मनात राग ठेवू नका. माणसं आहेत चुकतील, चुका करतील त्यांना आपण जपले पाहिजेच. माणूस आहे तोपर्यंत बोला उदया मृत्युनंतर त्याच्या चुकाचं काय करणार आहोत आपण??ज्यांना कोणाचाच आधार नाही, त्याचा आधार होण्याचा प्रयत्न करा. ज्यांनी तुम्हाला जपलय त्याना आयुष्यभर जपा... सतत पैशाच्या मागे धावू नका. तुम्ही माणूस आहात,पैसे कमावण्याची मशीन नाही. माणसाच्या आनंदात त्याच सुख अधिक फुलवता येणं आणि त्याच्या दुःखात दुःखाचा भागीदार होणं, म्हणजेच आयुष्य... काही माणसांकडे खूप पैसा असतो. पण त्याची त्यांची आशा कधी संपतच नाही. सुख- सोयी, आनंद साजरा करताना, पैसा खर्च करताना मात्र ही माणसं हात आखडता घेतात.यालाच म्हणतात ना, ऐपत असून चालत नाही दानत ही असावी लागते. आयुष्य जगताना कोणासाठी करता, किती करता याला ही एक मर्यादा असावी लागते. आपला मृत्यु झाल्यानंतर माणस आपलं नाव सुद्धा घेत नाहीत. कारण जीव गेलेल्या माणसाला या जगात एक बॉडी म्हणून संबोधल जात.आणि आपण कितीही कमावल तरी मागे आपल्याच नावाने बोलणारी आपलीच माणसं आहेत. मेल्यावरती आपल्यासोबत मातीच एक मडकं असत ते सुद्धा फुटून जातं. येत नाही आपल्या सोबत वरती... प्रत्येक गोष्टीत ताण-तणाव आहे. तडजोड आहे. कोणी श्रीमंत आहे, कोणी गरिब आहे. पण सुख मात्र कोणाला कितपत मिळतय हे ज्याच्या त्याच्या समाधानावर अवलंबून आहे. माणसाच्या जन्मात काही नाही आहे आपल्याला, जे यश मिळवायचे आहे, त्यासाठी आपल्याकडे खूप कमी वेळ आहे. या कमी वेळात खूप काही मिळवायचे आहे. आनंद लुटायचाय,आणि महत्वाचं म्हणजे आयुष्य जगायचय... माणूसच माणसाचा शत्रू झालाय एक पुढे चालला दुसरा पाय खेचतोय. अरे काय!!!हे काय आयुष्य आहे का?? मला वाटतं आयुष्य जगण्यासाठी अगोदर आयुष्याचा अर्थ समजून घेणं फार महत्वाचं आहे. तरच आयुष्य सुखा-समाधानाने जगता येईल.नाहीतर आयुष्य जगायच्या आधीच संपून जाईल.आयुष्य म्हणजे एकमेकांची सोबत पण काही वेळा काही व्यक्ती गरजेपुरते वापर करून घेतात आणि नंतर वाटायला लागतं काय साला आयुष्य जो तो येतो आणि वापर करून जातो. आयुष्यावरून विश्वास उठायला लागतो पण काही माणसं आयुष्यात अशी येतात आणि ती आपलं आयुष्य बनून जातात. वाटतं याच माणसासाठी आयुष्यभर जगावं आणि त्यांना जपाव. जितकं होईल तितकं सुख त्यांना द्यावा आणि त्यांच्या सुखातच सुख मानव. असतात काही निवडक माणसं जी आपलं आयुष्य बनून जातात. मग जगाची परवा नसते अख्या आयुष्यात कोणी येवो जाओ फरक पडत नाही. आयुष्यात काही निवडक माणसं असावी फक्त आपलीच असावी. आयुष्यात पैसा, प्रसिद्धी कमावणं काही अवघड बाब नाही पण त्याला टिकवून ठेवणे अवघड आहे तसच माणसं कमावण अवघड नाही पण जोडलेली नाती जपण अवघड आहे. म्हणून आयुष्यात काही कमी पण खास माणसं असावीत जी आपल्याला समजून घेतील, वेळप्रसंगी समजून सांगतील. इकडच जग तिकडे झाल तरी आपली साथ कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही. अशी माणसं आयुष्यात प्रत्येकाला भेटतात पण आपणच कधी कधी त्या माणसांना ओळखायला कमी पडतो आणि जे आपल्याला भाव देत नाहीत त्या व्यक्तीच्या मागे पुढे करत असतो. मग आपल्यावर जी माणंस निस्वार्थपणे प्रेम करतात ती हळू हळू आपल्या आयुष्यातून निघून जातात. यातून आपल्याला जेव्हा जाग येते तेव्हा सगळ संपलेल असत. म्हणूनच आपल्यावर निस्वार्थपणे प्रेम करणाऱ्या आपल्या माणसांना ओळखायला शिका. अशी माणसं आयुष्यात असतील जिवंतपणी स्वर्ग अनुभवायला मिळेल तसं ही मृत्यू नंतर स्वर्ग काय असतो ही फक्त कल्पनाच आहे. आपुलकीची माणसं असली तर सुख आहे आणि माणसात आपुलकीच नसेल तर सर्व सुख व्यर्थ आहे.... आयुष्यात एक माणूस म्हणून आपण जगातून गेल्यानंतर एक चांगली आठवण म्हणून कोणाच्या तरी हृदयात कायमस्वरूपी जिवंत राहता यायला पाहिजे ,

# सुरक्षा दलांना माझे मनस्वी अभिवादन!

राष्ट्रीय सुरक्षादिन सप्ताह हा त्या सर्व बलिदान करणाऱ्यांना समर्पित आहे, ज्यांनी आपले रक्त सांडून देशाचे रक्षण केले. या दिवशी भारत देश त्यांच्या धैर्य आणि उत्कटतेला सलाम करतो. आपल्या हृदयात स्थान असणाऱ्या अशा शहिदांच्या बलिदानाला कोणी शब्दात कसे काय मांडू शकेल? देशापुढील अनेक समस्या आणि विषयांवर राष्ट्रीय सुरक्षा दिनाच्या निमित्ताने कार्य केले पाहिजे. जेणेकरून देशात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ शकेल. नारी सुरक्षा याबद्दल सर्वांनी मिळून कार्य करणे आवश्यक आहे. श्री के.जी.निकोडे- केजीएन यांच्या लेखणीतून जाणून घ्या ज्ञानवर्धक माहिती... संपादक.

राष्ट्रीय सुरक्षा दिवस संपूर्ण देशात साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याचे मुख्य उद्दिष्ट सुरक्षिततेसह आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित विविध हालचालींविषयी लोकांना जागरूक करणे आहे. हा उत्सव साजरा करण्याचा आणखी एक उद्देश म्हणजे सुरक्षिततेसाठी विविध औद्योगिक क्षेत्रात लोक सहभागास प्रोत्साहित करणे. वेगवेगळ्या व्यवसाय मालकांद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना विविध सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित क्रियाकलापांमध्ये गुंतवून सहभागी करून घेण्याच्या दृष्टिकोनास प्रोत्साहित करणे. या मोहिमेद्वारे गरजांवर आधारित क्रियाकलाप, कायदेशीर आवश्यकतांसह आत्मपरीक्षण आणि कामाच्या ठिकाणी अधिकृत आरोग्य सुरक्षा आणि वातावरणाशी संबंधित क्रियाकलापांना पार पाडणे. मालक आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदारीची आठवण करून देऊन कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची निर्मिती करणे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सावधगिरीच्या प्रवृत्तीसह सुरक्षिततेस प्रोत्साहित करणे. आदी पैलूही सांगता येतील.

राष्ट्रीय सुरक्षा दिवस अर्थात नॅशनल सेफ्टी डे भारतात प्रत्येक वर्षी ४ मार्च रोजी पाळला जातो. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू म्हणजे आपल्या जीवनातील विविध वेळी जागरूक नसल्याने किंवा लक्ष न दिल्यामुळे होणारे अपघात रोखणे, हे आहे. सद्या आईबापच आपल्या अल्पवयीन मुलांकडे वाहने सुपूर्द करताना दिसतात. त्यामुळे अल्पवयीनांसह इतरांच्याही अपघाती मृत्यूच्या प्रमाणात भरमसाठ वाढ झालेली दिसते. पूर्वी साजरा केलेला राष्ट्रीय सुरक्षा दिन आता राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह म्हणून साजरा केला जात आहे. या आठवड्यात विविध जागरूकता कार्यक्रमांद्वारे औद्योगिक अपघात टाळण्याच्या पर्यायांवर लोकांना जागरूक केले जाते. या संपूर्ण आठवड्यात केल्या गेलेल्या प्रत्येक कार्याचा एकमात्र उद्देश म्हणजे लोकांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल जागरूक करणे आणि त्यांना संरक्षणाच्या विविध मार्गांबद्दल जागरूक करणे होय. हा दिवस प्रथमच दि.४ मार्च १९६६ रोजी साजरा करण्यात आला. ज्यामध्ये आठ हजार सदस्यांनी हजेरी लावली होती, त्यावेळी हा दिवस देशातील लोकांना सुरक्षिततेच्या दिशेने जागृत करण्याच्या उद्देशाने साजरा करणात आला होता. त्यात देशात व समाजात कशा प्रकारे एकमेकांची सुरक्षा लक्षात घेता कार्य करावे, त्या दिशेने प्रवृत्त केले गेले.

राष्ट्रीय सुरक्षा दिन हा देशाच्या सुरक्षा विभागास आणि देशाला सुरक्षा देणारे सर्व सैनिक यांच्यासाठी विशेष रूपाने साजरा केला जातो. या सर्वांमुळे देशाच्या सीमांचे रक्षण होते, या कारणास्तव देशात शांतता




आणि सुरक्षेची भावना निर्माण होते. या दिवशी आपण सर्व देशवासी या सर्व सुरक्षा दलांना मनापासून अभिवादन करतो. हा दिवस अस्तित्वात आणण्याचा उपक्रम नॅशनल सेफ्टी कौन्सिल तर्फेच करण्यात आला. ४ मार्च रोजी भारतात नॅशनल सेफ्टी कौन्सिलची स्थापना झाली, म्हणून हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिन म्हणून साजरा केला जातो. नॅशनल सेफ्टी कौन्सिल ही एक स्वायत्त संस्था आहे, जी सार्वजनिक सेवेसाठी अशासकीय आणि नफा न घेणाऱ्या संस्थेच्या रूपात काम करते. या संघटनेची स्थापना इ.स.१९६६मध्ये मुंबई सोसायटी ॲक्ट अंतर्गत करण्यात आली होती, ज्यात आठ हजार सदस्य होते. यानंतर इ.स.१९७२मध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर लवकरच हे राष्ट्रीय सुरक्षा दिनाऐवजी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह म्हणून साजरा करण्यास सुरूवात झाली.

राष्ट्रीय सुरक्षा ही त्या देशाचे अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक असलेली बाब आहे. ती आर्थिक ताकद, मुत्सद्देगिरी, ताकदीचे प्रक्षेपण व यासारख्या अनेक गोष्टी वापरून राखल्या जातात. ही बाब प्रथमतः दुसऱ्या जागतिक युद्धानंतर अमेरिकेत उदयास आली. तसेच ती राखण्यास आर्थिक सुरक्षा, उर्जा सुरक्षा व पर्यावरण सुरक्षा, सैन्याची ताकद व सायबर साचा सुरक्षा याही बाबी महत्त्वाच्या समजल्या जातात. व्याख्या- प्रत्येक राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे आणि अस्तित्वाचे रक्षण होण्यासाठी प्रत्येक राष्ट्र जी सुरक्षा व्यवस्था करते या व्यवस्थेला राष्ट्रीय सुरक्षा असे म्हणतात.

राष्ट्रीय सुरक्षा दिन उद्दिष्टे- स्वच्छता: देशाचे संरक्षण केवळ शत्रूपासून संरक्षण नव्हे तर आजारांपासून लोकांना सुरक्षित ठेवणे देखील आहे. राष्ट्रीय सुरक्षा दिवस प्रत्येकाला या दिशेने पाऊल टाकण्याचा मार्ग दर्शवितो. देश स्वच्छ ठेवणे देखील सुरक्षेच्या अंतर्गत येते. ज्यामध्ये सरकार आणि जनता तसेच उद्योगपती जबाबदार आहेत आणि या सर्वांनी एकत्रितपणे देशात स्वच्छता संबंधित सुरक्षा आणणे आवश्यक आहे, अशाप्रकारे स्वच्छता देखील सुरक्षा दिनाचे उद्दिष्ट आहे. अन्नः आजच्या काळात भेसळयुक्त वस्तूंचे प्राबल्य अधिक आहे, यामुळे बऱ्याच रोगांनाही कारणीभूत ठरत आहे आणि ही नवीन जनरेशन यामुळे कमकुवत होत आहे. देशाचे अधिक संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. हाच सुरक्षेचा देखील एक भाग आहे. गरिबी दुरिकरण: देशातील गरिबांची संख्याही खुपच आहे. त्यामुळे ते असुरक्षित आहेत. त्यांच्यासाठीही विचार करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. गरिबांवर भुकमरीची वेळ येऊ नये व त्यांना जगण्यासाठी काही साधन मिळू शकेल, याची काळजीही घेतली गेली पाहिजे. हासुद्धा सुरक्षेचा एक भाग आहे.

राष्ट्रीय सुरक्षादिन सप्ताह हा त्या सर्व बलिदान करणाऱ्यांना समर्पित आहे, ज्यांनी आपले रक्त सांडून देशाचे रक्षण केले. या दिवशी भारत देश त्यांच्या धैर्य आणि उत्कटतेला सलाम करतो. आपल्या हृदयात स्थान असणाऱ्या अशा शहिदांच्या बलिदानाला कोणी शब्दात कसे काय मांडू शकेल? देशापुढील अनेक समस्या आणि विषयांवर राष्ट्रीय सुरक्षा दिनाच्या निमित्ताने कार्य केले पाहिजे. जेणेकरून देशात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ शकेल. नारी सुरक्षा याबद्दल सर्वांनी मिळून कार्य करणे आवश्यक आहे. मुलींना मुक्केबाजी, कराटे यांसारखे स्वतःचे रक्षण स्वतः करू शकेल, असे शारीरिक बलवर्धक प्रशिक्षण दिले पाहिजे. एखादी घटना घडल्यानंतर शिक्षा देणे न्यायालयाचे काम आहे. परंतु या घटनांचा अंत करण्यासाठी आपण सर्वांनी विचार करणे व कार्य करणे आवश्यक आहे. तरच राष्ट्रीय सुरक्षा दिवस प्रभावी सिद्ध होईल. !! राष्ट्रीय सुरक्षादिन सप्ताहाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगरवॉर्ड,गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३**

# मराठा आंदोलनास येड्याची जत्रा म्हणणा-या चितळेला येड्याच्या इस्पितळाची खरी गरज

## बेताल तोंडाला लगाम लावा नसता संभाजी ब्रिगेड एकही कार्यक्रम होऊ देणार नाही - सेवकराम जाधव

**दैनिक वादळ वार्ता**

ब्राम्हण ऐक्य परिषदेच्या कार्यक्रमात केतकी चितळे जे बरळली त्याची शिक्षा तिला मिळणारच आहे. परंतु स्वतःचे तोंड आहे म्हणून सार्वजनिक ठिकाणी काहीही बेताल बरळू नये हे पण तितकेच खरे आहे. यापुढे कुठल्याही कार्यक्रमात बोलताना तोंडाला लगाम लावावा नसता संभाजी ब्रिगेड चितळे बाईंचा एकही कार्यक्रम होऊ देणार नाही. असा ईशारा संभाजी ब्रिगेडचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष सेवकराम जाधव यांनी दिला आहे.

परळी वैजनाथ येथे झालेल्या ब्राम्हण ऐक्य परिषदेत केतकी चितळेने अट्रॉसिटी हे रॅकेट असल्याचे वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी एकत्र येत तक्रार दाखल केली आहे. याच कार्यक्रमा दरम्यान मराठा योद्धा मनोज जरांगे पाटलांच्या आरक्षण आंदोलनास येड्याची जत्रा म्हणून हिनवण्या पर्यंत चितळे बाईंची मजल गेली आहे.

सार्वजनिक ठिकाणी नको ती बडबड करणाऱ्या मनोरुग्ण चितळे बाईस खऱ्या अर्थाने "येड्याच्या इस्पितळाची गरज" निर्माण झाली आहे. यापुढे कुठल्याही मंचावरून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील किंवा मराठा आरक्षण आंदोलन विषयी अपशब्द वापरला तर महाराष्ट्रात चितळे बाईंचा एकही कार्यक्रम होऊ दिला जाणार नाही. असा ईशारा संभाजी ब्रिगेडचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष सेवकराम जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# ब्र.भुत रामकृष्ण महाराजांच्या जय जयकाराने अवघी वरपगाव नगरी दुमदुमली.

## नागेशपुरी महाराज व रामकृष्ण महाराजानी अध्यात्माचे पावित्र्य जोपासले-महंत भगवान महाराज वरपगावकर

**वादळवार्ता/केज**

ब्र.भुत.रामकृष्ण महाराजांच्या जयजयकाराने वरपगाव नगरी दुमदुमली असून यावेळी मान्यवरांनी व हजारो भाविक भक्तगणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक महाराज उपस्थित होते. त्यामुळे परिसर भक्तिमय दिसून आला व गावाला यात्रेचे स्वरूप आले होते . श्रीक्षेत्र साधू शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव ता केज येथील ब्र .भुत .रामकृष्ण महाराज यांच्या १८ व्या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या मार्ग दर्शनाखाली २३ फेब्रुवारी ते १मार्च दरम्यान भव्य दिव्य हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण श्री परम पुज्य ह भ प महेश महाराज टेकाळे यांनी तर दुपारी २ ते ५ वाजेपर्यत भागवत कथा प पु रामकृष्ण महाराज शास्त्री आंळदीकर यांच्या रसाळ वाणी युक्त कथेमुळे भाविक व भक्तगण आणि विशेषःत महिला वर्गाची अलोट गर्दी झाल्यामुळे हा परिसर गजबजून गेला होता या सप्ताहामुळे अनेक मान्यवरांची अमृततुल्य कीर्तने झाली यावेळी आपापल्या परीने अनेक भाविकांनी अन्नदान करून उपस्थितांची सेवा केली. विशेष म्हणजे टँकट्रमधे भरून महाप्रसादाचे वाटप करण्यातआले येथे एक भक्ताचा महापूर आल्याचे दिसले. हभप मच्छिन्द्र महाराजानी अनेकांचे शुक्रवारी अभिषेक केले त्यानंतर हभप भगवान महाराज यांचे अमृततुल्य




काल्याचे कीर्तन संपन्न झाले त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाने व्यसनापासून दूर राहवून जिवनात आदर्श निर्माण करावा आणि साधू हे वैराग्य मूर्ती असून ते साधुच असतात नागेशपुरी महाराज आणि वैकुंठवासी रामकृष्ण महाराज हे महान संत होते त्यांनी समाज प्रबोधन करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे महान कार्य केले त्यामुळे येथे भक्तांची झालेली मांदियाळी या वरून सिद्द होते कि वै रामकृष्ण महाराज तपश्चर्या आणि त्यांची भक्तावर असलेले प्रेम ही त्याची पावती म्हणजे येथे झालेली हजारो भक्तांची उपस्थिती होय असे विचार मांडत महंत रामकृष्ण महाराज हे अध्यात्मिक प्रबोधनाचे चालते बोलते विद्यापीठ होते असे विचार मांडले मंहत भगवान महाराजांनी काल्याच्या अमृतुल्य किर्तनातुन मांडले. या सप्ताहमध्ये भक्तांनी विविध किर्तनकारांच्या विचारांना आत्मसात केले. या सप्ताहत शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव येथे अनेकांनी विविध दुकाने लावली होती, त्यामुळे या परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती रामकृष्ण महाराज यांच्या जयघोषाने ही नगरी दुमदुमून गेली होती. त्या नंतर उपस्थित भक्तांनी महाप्रसादचा लाभ घेतला यावेळी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते

अनेक मान्यवरांची उपस्थिती यावेळी हभप प्रकाश साठे महाराज , ह भ प . ज्ञानेश्वर महाराज लांब दिलीप महाराज खानापूरकर,हभप दीपक महाराज मेटे लव्हरी हभप गणेश महाराज माळेगावकर, हभप, परमेश्वर महाराज जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, रमाकांत मुंडे विजयकांत मुंडे विष्णू घुले, सुनील गलांडे, किसनदादा कदम, भगवान केदार शेषेराव कसबे अकलूज चे प्राचार्य डॉ आबासाहेब देशमुख, डॉ टी एल देशमुख सह पंचक्रोशीतील मान्यवर उपस्थित होते.यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला यावेळी वरपगाव ग्रामस्थांनी वतीने भक्तगणाचे आभार मानले

# ज्ञानदीप विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न.



वादळवार्ता/किल्लेधारूर

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात स्वंयशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिवसभराचे सर्व व्यवस्थापन सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पणे सांभाळले.

धारूर येथील ज्ञानदीप विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी सकाळी परिपाठापासून ते शाळा सुटेपर्यंतचे मुख्याध्यापक, शिक्षक ते सेवक पर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत सर्व नियोजन केले. सकाळी आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी दररोज प्रमाणे शालेय परिपाठाचे सादरीकरण केले तसेच सर्व विषयाच्या वर्गानुसार तासिका घेतल्या. या स्वयंशासन दिनाची मुख्याध्यापक म्हणून भूमी अतुल शिनगारे तर उपमुख्याध्यापक अथर्व सूर्यकांत जगताप व शाहिद जहीर शेख तसेच सेवक व इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हा स्वयंशासन दिन यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक रामराजा दराडे व अशोक अंडील यांनी नियोजन करत सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. स्वयंशासन दिन उत्साही व आनंदी

## होळी सणासाठी कोकणात जाण्यासाठी उरण आगारातून प्रवाशांसाठी ज्यादा बसेसची व्यवस्था करण्याची मागणी.

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

हिंदुच्या अनेक महत्वाच्या सणापैकी होळी हा एक महत्वाचा सण असून कोकण विभागात खेडोपाडी गावोगावी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुंबई नवी मुंबई आदी ठिकाणी काम करत असलेले नोकरदार कामगार वर्ग, चाकरमानी होळी सण मोठया उत्साहात साजरे करण्यासाठी आपल्या गावी कोकणात जात असतात. कोकणात होळी सणासाठी प्रवास करताना कोकणी माणसाला, नागरिकांना कोणत्याही अडचणी येऊ नये,कोकणी माणसाचा प्रवास सुखाचा आनंदाचा सुलभ व्हावा या दुष्टीकोनातून दरवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था (उरण) च्या पाठपुराव्याने उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी व उरण मध्ये परत येण्यासाठी ज्यादा बसेस सोडल्या जातात.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था (उरण) तर्फे उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी ज्यादा बसेस सोडण्यात यावेत अशी मागणी करण्यात आलेली आहे.सदर ज्यादा बसेस सोडण्यासाठी संस्थेचे सचिव रविंद्र चव्हाण यांनी उरण बस आगार तसेच मुख्य कार्यालय असलेल्या मुंबई कार्यालय मध्येही पत्रव्यवहार केलेला आहे.उरण ते रत्नागिरी, उरण ते खेड, उरण ते देवरुख, उरण ते कणकवली, उरण ते गणपतीपुळे या मार्गावर ज्यादा बसेस सोडण्याची मागणी कोकण वासीय उत्कर्ष संस्था उरण तर्फे उरण बस आगार व्यवस्थापक सतीश मालचे यांना करण्यात आली आहे. आगाराचे व्यवस्थापक सतीश मालचे यांनी या पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# वीज कंत्राटी कामगारांचा एन . एम. आर .च्या मागणी करिता दोन दिवसांच्या लाक्षणिक संपामध्ये महाराष्ट्र राज्यामधील ९५ % कामगार सहभागी.

## राज्य सरकारने सकारात्मक चर्चा करून कामगारांना न्याय द्यावा वीज ऊद्योग कंत्राटी कामगार कृती समितीची मागणी.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

महावितरण,महापारेषण व महानिर्मीती कंपनीतील कंत्राटी कामगारांनी ५ मार्च २०२४ पासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे. या पार्श्वभूमीवर ५ टप्पा गाठला आहे या वेळी ४८ तासांचा लाक्षणिक बंद आंदोलन यशस्वी झाला आहे. या आंदोलनात महाराष्ट्रातील महानिर्मीती, महापारेपण, महावितरण व मुंबई मधील मुख्य कार्यालय कामगार सहभागी झाले आहे. या लाक्षणिक बंद चा संदेश राज्य सरकार, मा.उर्जा मंत्री, प्रशासनाने घेवून कामगारांना एन एम आर माध्यमातून कायम नोकरीत समाविष्ट करावेत अन्यथा दि ५ मार्च २०२४ पासून बेमुदत काम बंद आंदोलन अटळ आहे.असा ईशारा कृती समिती चे पदाधिकारी नीलेश खरात व नचीकेत मोरे यांनी मुख्य कार्यालय प्रकाश गड समोर झालेल्या आंदोलना मध्ये दिला आहे. कामगार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य चे कामगार उपायुक्त (औस) मा.संतोष भोसले यांनी तिन्ही कंपनी व वीज कंत्राटी कामगारांच्या संयुक्त कृती समितीला सोमवार दि २६ फेब्रवारी २०२४ रोज़ी प्रशासन च्या नकारात्मक भूमिका मुळे बैठक अयशस्वी झाली होती. या बैठकीत मध्ये कृती समिती ने खर्चात बचती चा प्रस्ताव ही फेटाळला होता. वीज उद्योगातील सर्व कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित रोजगार दिल्यास प्रशासकीय खर्चात दर वर्षी सुमारे २ अब्ज ३२ कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत पडू शकतात. या साठी कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा, समान काम समान वेतन द्यावे. व वयाच्या ६० वर्षा पर्यंत रोजगार द्यावा या व अन्य महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरात ९ फेब्रुवारी पासून राज्यातील सर्व जिल्ह्यात आंदोलन चालू आहे. हे सनदशीर मार्गाने चाललेले आंदोलन दडपण्यासाठी कंत्राटदारच्या माध्यमातून अशिशीक्षत,अनुभव नसलेल्या, पोलिस व्हेरीफीकेशन न करता कामगारांना कामाला लावण्याचे बेकायदेशीर प्रयत्न चालू आहेत. सदरील कामगारांना अनुभव नसल्याने वीज ऊद्योगात मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.कामगारांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.तरी प्रशासन ने बेकायदेशीर कृती त्वरित बंद करून कृती समिती पदाधिकारी समावेत सकारात्मक चर्चा करून कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी कृती समिती संघटक सचिन मेंगाळे यांनी केलेली आहे.

राज्यभरात एकूण २७ संघटनेचे कामगार आंदोलनात उतरले आहेत. पुणे मधील या आंदोलनाला मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय मजदूर संघ चे केंद्रीय पदाधिकारी अण्णा धुमाळ,पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण,उमेश विस्वाद , कामगार महासंघाचे सुरेश जाधव, वर्कर्स फेडरेशनचे पोहेकर, विषेश उपस्थित होते. मिटिंग मध्ये निलेश खरात, सचिन मेंगाळे,राहूल बोडके, उमेश आणेराव,निखिल टेकवडे, प्रवीण पवार, मार्गदीप मस्के, अशोक गहिने,रामदास खराडे व मंगेश कोहीनकर आदी पदाधिकारी यांनी महत्वपूर्ण



मार्गदर्शन केले.मा.ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सुचनाकडे प्रशासकीय अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची भावना सर्व संघटनांची असून ऊर्जामंत्री कामगार मंत्री, प्रधान सचिव ऊर्जा व प्रधान सचिव कामगार यांनी मिटिंग घेऊन कायम स्वरूपी तोडगा काढावा राज्यात कंत्राटी कामगारांच्या हितार्थ हरियाणा पॅटर्न चालू करावा अशी अपेक्षा संयुक्त कृती समितीने महाराष्ट्रात विविध ठिकाणी झालेल्या मिटींग मधे व्यक्त केली आहे .

# पाटोदा थडी येथील सकल मराठा बांधवांच्या वतीने लोकसभा निवडणूकीसाठी दोन उमेदवार रिंगणात !

दैनिक वादळ वार्ता
नांदेड/हानुमंत चंदनकर

नांदेडच्या धर्माबाद तालुक्यातील पाटोदा थडी येथील सकल मराठा बांधवांच्या



वतीने मनोज पाटील जरांगे यांच्या साखळी उपोषणाला पाठिंबा व संगे सोयरे यांची अंमलबजावणी सरकारने न केल्याने लोकसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवार रिंगणात उभे करण्याचा एकमताने निर्णय सकल मराठा बांधव पाटोदा थडीच्या वतीने घेण्यात आला आहे सरकार मराठा बांधवांना आरक्षण दिल परंतू ते ओ बी सी मधून दिल नाही व संगे सोयऱ्याची अंमलबजावणी केली जात नाही यासाठी हा निर्णय सकल मराठा बांधवांच्या वतीने घेत आहोत व प्रत्येक गावागावातून सकल मराठा बांधव आपआपल्या गावातून लोकसभेसाठी उमेदवार अभे करावेत असे आवाहन पाटोदा थडी येथील सकल मराठा बांधव केले आहे.

# आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रविवार ३ मार्च रोजी आस्थीरोग तपासणी

## मनके व सांधे बदली शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

**वादळवार्ता/बीड**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे रविवार दि. ३ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणाऱ्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.



या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणाऱ्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे. रविवार दि.३ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड शहरातील सर्व सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

संपादक ; अजय भांगे मो. ९४२२६६००७७



जि.प.शाळा केळगाव येथील लहान- चिमुकल्या विद्यार्थ्यांनसाठी आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते सदरील आनंदनगरीस पवनराजे इंग्लिश स्कूल केजचे संस्थापक अध्यक्ष तथा केळगावचे भूमिपुत्र खंडेराव चौरे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले पसंगी जि.प. शाळेतील विद्यार्थी तथा शिक्षक वृंद.

# राजेश पाटील आणि आनंद शिंदे यांनी उंचावली केज पोलीस ठाण्याची मान !





## जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्याकडून प्रशंसा

**वादळवार्ता/केज**

जिल्हा पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी केज पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि पोलिस उपनिरीक्षक आनंद शंकर शिंदे यांनी केज येथील कला केंद्र आणि घोगस पारगाव येथील २७ लाख रु चा गांजा प्रकरणी केलेल्या कारवाईची दखल घेत त्यांना प्रशस्ती पत्रक देऊन प्रशंसा केली आहे. केज पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांनी तात्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली केज येथील कला केंद्रावर टाकलेल्या धाडीत पीडितांचेबाल लैगिंक अत्याचार अधिनियमसह अनैतीक व्यापार प्रतिबंधा अधिनियम आणि बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम याद्वारे गुन्हा दाखल करून त्याचा तपास केला तसेच दिनांक १२ सप्टेंबर २०२३ रोजी शिरीर कासार तालुक्यातील घोगसपारगांव येथे छापा टाकुन ५ क्विंटल ४५ किलो ५४ ग्रॅम अवैद्य गांज्याची झाडे ज्याची किंमत २७ लाख२७ हजार ७०० असलेला मुद्देमाल जप्त करून एक आरोपीस अटक केली. आरोपी विरुध्द पोलीस ठाणे चकलंबा येथे एनडीपीएस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यास मदत केली आहे. त्याची दखल जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी घेतली त्या त्यांच्या कामाचे कौतुक करून जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर त्यांना प्रशस्ती पत्र देऊन गौरव केला आहे प्रशस्ती पत्रात त्यांनी म्हटले आहे की, तुमच्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येते. तसेच यापुढे भविष्यातही आपण अशाच प्रकारे तपास करुन उत्कृष्ठ कामगिरी करुन बीड जिल्हा पोलीस दलाचे नावलौकिक वाढवावे अशी अपेक्षा बाळगतो. या बद्दल पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांचे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मिना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग, पोलीस निरीक्षक कादरी, सर्व पोलीस कर्मचारी, पत्रकार आणि नागरिकांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक विज्ञान दिवस निमित्त भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन




वादळवार्ता/परळी

नोबेल पारितोषिक विजेते सी. व्ही.रमण यांच्या जयंती निमित्त दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनी प्रशालेत भव्य विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. यावेळी पहिलीपासून ते दहावीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला. यामध्ये विद्यार्थ्यांनी चार्ट मेकींग, नॉन वर्किंग व वर्किंग मॉडेल द्वारे त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन मांडला. सदर स्पर्धेत यश मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशालेचे प्राचार्य श्री.विठ्ठल तुपे सर आणि प्रशालेचे डायरेक्टर श्री.श्रीकांत पाटील सर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. आमच्या प्रशालेच्या वतीने वेळोवेळी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते .जेणे की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण , नैतिक मूल्यांचा विकास साधला जाईल. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन ,चिकित्सक गुण वृद्धिंगत व्हावा तसेच कल्पनाशक्तीला प्रत्यक्षात उतरवण्याची संधी मिळावी यासाठी आम्ही निरंतर प्रयत्न करत असतो. विज्ञान प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या तसेच विजेत्या सर्व विद्यार्थ्यांचे विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषा किरण गित्ते तसेच आमचे नेहमीच मार्गदर्शक ठरलेले श्री किरण गित्ते साहेब यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी सर्व विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले तसेच सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले.

# नशा मार पोलिस पथकासाठी खुर्शीद आलम यांनी घेतली पोलिस आयुक्तांची भेट



वादळवार्ता/बीड

आज पोलिस आयुक्त मा.श्री. मिश्रा साहेब बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते, यावेळी माजी सभापती तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी एका शिष्टमंडळासह पोलिस आयुक्त यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करत म्हटले आहे की बीड जिल्हा पोलिस दलाचे काम विविध क्षेत्रात समाधानकारक आहे, गेल्या काही दिवसांपासून पासून दोन नंबरचे धंदे वाल्यांना आणि विशेष म्हणजे नशेच्या पदार्थ विकणार्यासाठी तर बीडची पोलिस कर्दनकाळ बनलेली आहे त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये नशेचे प्रमाणात घट होत असले तरीही आम्ही बीडकरांना बीड शहर नशा मुक्त करायचा आहे म्हणून आम्ही सामाजिक-धार्मिक लोक सुद्धा गल्ली मोहल्ल्यात फिरून नशा मुक्ततीसाठी काम करत आहोत, आमच्या मोहीमेला बीड पोलिसांचे सहकार्य तर आहेच तरी पण एक मागणी अशी की पोलिसांकडून एक विशेष पथक म्हणजेच नशा मार पोलिस पथक बीड असे सुरू करण्यात यावे अशी मागणी खुर्शीद आलम यांनी पोलिस आयुक्त मा.श्री. मिश्र साहेब यांच्याकडे केली आहे, मागणी नंतर मा. पोलीस आयुक्त साहेबांनी बीडचे कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांच्याशी चर्चा केली असून लवकरच बीड शहरात नशा मार पोलिस पथक लवकरच सुरू होईल असे अपेक्षा आहे, या शिष्टमंडळात प्रामुख्याने जाणता राजा युवामंच चे संस्थापक अध्यक्ष महेश शिंघण,से. नि.जिल्हाध्यक्ष शेख वजीर आत्तार, उत्तमजी ओव्हाळ, दस्तगीर इनामदार, अमोल आहीरे,नदीम सर बागे,जाबेर कुरेशी, मोमीन माजेद,शेख मतीन भाई व इतर मान्यवर उपस्थित होते,

## गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार दि. ६ मार्च रोजी विठल महाराज शास्त्री यांचे कीर्तन

वादळवार्ता/बीड

माघ वदे एकादशी निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि. बीड येथे ह.भ.प. आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री श्रीक्षेत्र निळकंटेश्वर संस्थान वेदांत नगर यांचे बुधवार दिनांक ६ मार्च २०२४ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. यावेळी फराळाचे अन्नदाते राधाकीसन जाधव, रंगनाथ लांडे घाटसावळी तरी या किर्तनाचा व दुसरे दिवशी द्वदशी प्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व दुसरे दिवशी सकाळी द्वदशी पंगतीचे अन्नदाते भीमराव मुकादम, नवनाथ टेलर दामोधरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालय व महाविद्यालय कौशल्य विकास केंद्र बीड यांच्यात सामंजस्य

श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ महाविद्यालयातील युवक- युवतींना व्हावा या दृष्टिकोनातून बीड जिल्ह्यातील नामांकित सिद्धेश्वर महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक युवतींना



रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने Pickle making technician. व Microfinance Executive असे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तरी या कोर्स करिता 18 ते 45 वय असलेले प्रवेश घेऊ शकतात .याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास केंद्रचे असिस्टंट कमिशनर श्री. सुशील उचले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. संतोष लिंबकर, प्रा.अक्षय जगताप, श्री. उत्तरेश्वर आनेवार उपस्थित होते.

# बीड लोकसभेसाठी २५३४ मराठा उमेदवार उतरणार मैदानात मराठा समाज घेणार लोकशाहीचे ब्रम्हास्त्र हातात!

## राजकीय स्टेजवर मराठा समाज जाणार नाही

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

बीड : सगेसोयरेच्या अध्यादेशासाठी मनोज जरांगे पाटील यांचा लढा सध्याही सुरूच आहे. याच अनुषंगाने आज बीड शहरामध्ये बीड तालुकास्तरावरील आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सर्व समाजबांधवांच्या उपस्थितीमध्ये एकमताने काही ठराव घेण्यात आले. यात प्रामुख्याने तोंडावर आलेल्या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये प्रत्येक गावातून दोन उमेदवार मराठा समाज लोकसभेमध्ये उतरविणार असल्याचा ठराव एकमताने घेण्यात आला. बीड जिल्ह्यामध्ये एकूण 1267 गावे असून प्रत्येक गावातून जर दोन उमेदवार म्हटले तर ही संख्या 2534 वर जाते. कोणत्याही निवडणूकीमध्ये चारशे उमेदवाराच्या पुढे उमेदवार आले तर ती निवडणूक रद्द करावी लागते यामुळे मराठा समाजाने घेतलेल्या या निर्णयामुळे लोकसभा निवडणूकीची गोची होण्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे. राज्यसरकारने लवकरात लवकर सगेसोयरे अध्यादेशाचे कायद्यात रूपांत करून मराठा समाजाला न्याय अशीही मागणी आता होत आहे. बीड शहरातील मुक्ता लॉन्स परिसरामध्ये आज बीड तालुकास्तरावरील मराठा समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला तालुकाभरातून मराठा समाज उपस्थित होती. या बैठकीमध्ये काही ठराव घेण्यात आले. यात पहिला ठराव असा होता की, प्रत्येक गावातून लोकसभेसाठी दोन उमेदवार देण्यात येणार, राज्यसरकारने दिलेले 10 टक्के आरक्षण आम्हाला मान्य नाही, सगेसोयरे अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करा, मनोज जरांगे पाटील जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असे ठराव एकमताने या बैठकीत घेण्यात आले. मराठा समाजाने आता लोकशाहीचे ब्रम्हास्त्र हातात घेतल्यामुळे 2024



च्या महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूका मात्र होतील की नाही किंवा या निवडणूकीपूर्वी राज्यसरकारला सगेसोयरे अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करावे लागेल, नसता निवडणूका रद्द कराव्या लागतील अशी परिस्थिती राज्यात निर्माण होवू नये यासाठी राज्य सरकारने मराठा समाजाचा सगेसोयरेचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी होत आहे. बीडच्या बैठकीत एकमताने ठराव मंजूर

मंजूर झालेले ठराव

राजकीय स्टेजवर मराठा समाज जाणार नाही

राज्य सरकारने दिलेले दहा टक्के आरक्षण आम्हाला मान्य नाही

मनोज जरांगे पाटील ठरवतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल

सगेसोयरे अध्यादेशाची अमलबजावणी करा

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )